तरुण भारत
सातारा
www.tarunbharat.com
₹ ४.०० गुरुवार दि. २९ सप्टेंबर २०१६ बेळगाव

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

## डी. पी. भोसले कॉलेजमध्ये युवा महोत्सव

**कोरेगाव :** येथील डी.पी. भोसले महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठा अंतर्गत ३६ वा सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन केलेले असून युवा महोत्सव महाविद्यालयात शनिवार १ रोजी होणार आहे.

युवा महोत्सवाचे उद्घाटन आमदार डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचे महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे प्रमुख प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील हे आहेत. प्रमुख उपस्थितीत सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर व विद्यापीठाचे, संस्थेचे विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

युवा महोत्सवात जिल्ह्यातील ७५ महाविद्यालये सहभागी होणार असून सुमारे २००० विद्यार्थी-कलाकार लोकनृत्य, लोककला, एकांकिका, पथनाटय, लघुनाट्य, सुगमगायन, समुहगीत, वाद-विवाद व वक्तृत्व अशा १३ कला प्रकारामध्ये आपले कला कौशल्य अभिव्यक्त करणार आहेत. डी.पी.कला मंच, कर्मवीर कला मंच, हॉल, इनडोअर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व खुल्या रंगमंचावरती या कार्यक्रमांचे सादरीकरण होणार आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ. सावंत यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.